महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनस्तर S-२० : ५६१००-१७७५००) या संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या विनंती बदल्या.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन आदेश, क्रमांकः बदली २०१८/प्र.क्र.४६० /सेवा-३

१० वा मजला, संकुल इमारत, गो.ते. रुग्णालय, संकुल इमारत,
मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
दिनांक : ०६ जून, २०१९.

<u>शासन आदेश:-</u>

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनस्तर S-२० : ५६१००-१७७५००) या संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या महाराष्ट्र कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) व कलम ४ (५) च्या तरतुदीनूसार खालील विवरणपत्रामध्ये दर्शविल्या प्रमाणे विनंती बदल्या करण्यात येत आहेत.

अ.क्र.	वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव	सध्या कार्यरत ठिकाण	बदलीचे ठिकाण
१.	२.	३.	४.
१	डॉ श्रध्दा सवरा	स्व. इदीरा गांधी स्मृती रुग्णालय, भिवंडी जि ठाणे	ग्रा रु अंबाडीफाटा ता भिवंडी जि ठाणे

१) बदली करण्यात आलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांच्या बदली झालेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्याकरीता पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे आणि संबंधीत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर होऊन, त्याबाबतचा रुजू अहवाल संबंधित उप संचालक, आरोग्य सेवा (परिमंडळ); संचालक, आरोग्य सेवा, मुंबई आणि शासनास सादर करावा.

२) बदली झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी, त्यांना कार्यमुक्त केल्यानंतर अनुज्ञेय पदग्रहण अवधीत नविन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू व्हावे. जे वैद्यकीय अधिकारी या कालमर्यादेचे पालन करणार नाहीत आणि पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न होता परस्पर गैरहजर राहतील, अशा अधिकाऱ्यांची अनुपस्थिती **“अनधिकृत गैरहजरी”** म्हणून समजण्यात येईल व पर्यायाने त्यांच्या सेवेत खंड पडण्याची शक्यता नाकारता येत नाही याची जाणीव सर्व संबंधीतांना करुन देण्यात येत आहे.

३) आरोग्य सेवा संचालनालयाने जे वैद्यकीय अधिकारी त्यांचे पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होणार नाहीत त्यांचे विरुध्द वेळीच कारवाई सुरु करावी. जेणेकरुन वैद्यकीय अधिकारी वेळीच नविन पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होतील. सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक आठवडयाच्या आत संबंधीत अधिका-यांना कार्यमुक्त करण्याची जबाबदारी पर्यवेक्षकीय अधिकारी तथा उपसंचालक आरोग्य सेवा (परिमंडळ) यांची राहील.

४) या बाबी विचारात घेऊन या प्रकरणी वेळोवेळी शासनास अवगत करावे व संबंधित परिमंडळाचे उप संचालक, आरोग्य सेवा यांनी रिक्त पदाच्या अद्ययावत तपशीलासह अनुपालन अहवाल संचालक आरोग्य सेवा यांच्या मार्फत शासनास सादर करावा.

५) सदर आदेश महाराष्ट्र कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) आणि ४ (५) च्या तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६०६१४५६०२९५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2019.06.06 15:43:04 +05'30'

(व. मुं. भरोसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संबंधित वैद्यकीय अधिकारी गट-अ (यांना संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांच्या मार्फत)

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र १ /२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
२) संचालक आरोग्य सेवा, मुंबई.
३) उपसंचालक आरोग्य सेवा, मुंबई मंडळ ठाणे.
४) जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे.
५) जिल्हा कोषागार अधिकारी ठाणे.
६) निवडनस्ती (सेवा-३)